**<u>आर.सी.सी .क्र.५२०/२०२५</u>**

**सरकार वि. रशिद शेख**

**नि.क्र.२६**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुरावा</u>.**

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करते/करतो की,

माझे नांव – शाहरुख दस्तगीर शेख,
वय – २७ वर्षे , व्यवसाय – शेती,
राहणार – बालमटाकळी, ता. शेवगाव, जि.अहमदनगर

<u>सरतपासणी सहा. सरकारी वकील **श्रीमती पी.आर.गिते यांचेमार्फतः**</u>–

मी सर्व आरोपींना ओळखतो. ते आमचे नातेवाईक आहेत. अलीशान ही माझी आई आहे.

०२. घटना ही दि.२२.०९.२०२५ रोजी सायंकाळी ०९.०० वाजण्याच्या सुमारास आमच्या घरापाशी घडली होती. त्यावेळी आरोपी आणि आमच्या दरम्यान किरकोळ वाद झाला होता. त्या व्यतिरिक्त काही घडले नव्हते. मी रागाच्या भरात शेवगाव पोलीस स्टेशन येथे फिर्यादी दिली होती. आता साक्षीदाराला फिर्याद दाखवली. फिर्यादीवर माझी सही आहे. फिर्यादीतील मजकुर मला माहित नाही.

*(**साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी मंजूर करण्यात आली**).*

०३. हे म्हणणे खरे नाही की, दि.२२.०९.२०२५ रोजी सायंकाळी ०९.०० वाजण्याच्या सुमारास आरोपींनी मला, माझी आई अलिश व वडील दस्तगीर यांना लाकडी दांड्याने व लाथाबुक्याने मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आम्हाला शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझा पुरवणी जबाब देखील नोंदवला होता. साक्षीदारास फिर्यादीतील व पुरवणी जबाबातील अधोरेखांकित भाग 'अ' वाचुन दाखवण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन माझ्या सांगण्याप्रमाणे तो नमुद करण्यात आला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे व आरोपी दरम्यानचा वाद

मिटलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिटल्यामुळे आरोपींना वाचवण्यासाठी आजरोजी न्यायालयात मी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.ए.व्ही.काकडे यांचेमार्फतः–</u>**

०४. हे म्हणणे खरे आहे की, पाय घसरुन पडल्यामुळे माझ्या डोक्याला मार लागलेला आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृति

KULKARNI DATTATRAYA RAMESH

Digitally signed by KULKARNI DATTATRAYA RAMESH
Date: 2026.03.25 16:55:53 +0530

दिनांक– २५.०३.२०२६

(डी.आर.कुलकर्णी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी
कोर्ट नं.३ शेवगाव.